क्र. पोमसं/२१/७२७२/पोलीस संरक्षण /४९/२०१०          मुंबई दिनांक २०.१.२०१०

विषय - जिवास धोका असलेल्या व्यक्तींना पोलीस संरक्षण देण्याबाबत

---०००---

परिपत्रक

Social Activist व माहितीचा अधिकाराव्दारे जे महत्त्वाचे जनहिताचे विषयांवर कामे करतात किंवा कोर्टातून जनहित याचिका दाखल करून लोकांना न्याय मिळण्याच्या दृष्टीने कामे करतात अशांना काही वेळी ज्या लोकांचे विरूध्द कारवाई /आंदोलन/याचिका करीत आहे असे लोकांकडून किंवा त्यांचे हस्तकांकडून धमकी वगैरे देण्यात येते किंबहुना जिवास धोकाही निर्माण होणे संभवतो. अशा काही प्रकरणांमध्ये असे काही Social Activist पोलीसांकडे तक्रार करून स्वत:साठी संरक्षणासाठी अर्ज करतात.

समाजात जनहितासाठी लढणा-या लोकांचे रक्षण करणे हे शासनाची व पोलीसांची जबाबदारी समजून त्यांच्या अशा तक्रारींवर योग्य चौकशी व कारवाई त्वरेने करणे हे आपलीच जबाबदारी आहे.अशा क्रियाशिल व्यक्तींनी उचललेल्या मोहिमेमुळे ब-याचशा व्यक्तीं तसेच काही शासकीय अधिकारी /कर्मचारी दुखावली जातात किंबहुना त्यांचे हितसंबधास बाधा निर्माण होते. म्हणून अशा लोकांना विरोध निर्माण होतो व काही वेळा शासकिय अधिकारी /कर्मचा-यांकडून तसेच काही पोलीस अधीका-यांकडूनही विरोध होतो व त्यांच्या तक्रारीच्या चौकशीत टाळाटाळ / विलंब लावण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

असे Social Activist यांना व त्यातच असे काही लोकांनी ज्यात संबंधीत न्यायालयात जनहित याचिका दाखल केलेली आहे अशा लोकांवर हल्ले होण्याची प्रकरणे घडलेली आहेत. तरी सर्व घटक प्रमुखांना स्पष्टपणे सूचना देण्यात येत आहेत की, असे जे Social Activist अशी आंदोलने अथवा जनहीत याचिकांव्दारे भ्रष्टाचार किंवा सामाजिक मुद्यांवर लढा देत असतील त्यांच्या सुरक्षिततेबददल योग्य लक्ष ठेवण्यात यावे त्यांना धमकी वगैरे देणा-यांविरूध्द योग्य कायदेशीर कार्यवाही योग्य कायदयाच्या तरतुदीनुसार वेळीच करावी, जेणेकरून अशा लोकांवर कायदयाचा वचक राहिल व Social Activist ना कायदयाचे /शासनाचे संरक्षण मिळेल.

अशा Social Activist नी त्यांना संरक्षण देण्याबददलचे अर्ज केल्यास त्याची तातडीने चौकशी केली जावी त्यांना असलेल्या धोक्याबाबत सखोल चौकशीचा स्वतंत्रपणे आढावा घेण्यात यावा व सर्व बाबींचा सर्वकश विचार करून शासनाच्या प्रचलीत नियम- धोरणाच्या अधीन राहून संबंधीताना संरक्षण देण्याबाबत आवश्यक असल्यास योग्य ते निर्णय घटक प्रमुखांनी स्वत: घ्यावेत. चौकशी करण्यात व निर्णय घेण्यात वेळ लागल्याच्या कारणांने कोणत्याही Social Activist ला धोका /इजा होणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

या सर्व बाबींची काटेकोरपणे काळजी घेतली जाईल अशा प्रकारची हमी आमच्यातर्फे मा. उच्च न्यायालयात दिली आहे.

[रश्मि शुक्ला]
विशेष पोलीस महानिरीक्षक [का व सु ]
पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचेकरिता

प्रति,

अपर पोलीस महासंचालक, ना.ह.सं./ प्रशिक्षण /महामार्ग /रा.रा.पो.बल/ प्रशासन / आस्थापना /दहशतवाद विरोधी पथक /लोहमार्ग म.रा. मुंबई

सर्व पोलीस आयुक्त

सर्व पोलीस अधीक्षक

प्रत-

आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा. मुंबई
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक